**S.N.D.T. Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
New Marine Lines, Churchgate,
MUMBAI - 400 020.
Phone : + 91 22 2203 1879
Fax : + 91 22 2201 6226

A- Grade (CGPA 3.08)

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग, न्यु मरिन लाईन,
चर्चगेट, मुंबई - ४०००२०.
Telegram : UNIWOMEN
Website : sndt.ac.in

शैक्षणिक /परिपत्रक/२०२१-२२/ १०४८ दिनांक : १५ जानेवारी २०२२

**परिपत्रक :-**

**विषय : दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी 'राष्ट्रीय मतदार दिन' राबविण्याबाबत.**

संदर्भ : उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२१/प्र. क्र १५३/विशि-३, मंत्रालय, मुंबई, दिनांक २२.१२.२०२१

श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठाशी (एस.एन.डी.टी.) संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य तसेच विद्यापीठाच्या सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभागांचे विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, दि. २५ जानेवारी, १९५० रोजी भारत निवडणूक आयोगाची स्थापना झाली. भारत निवडणूक आयोगाचा स्थापना दिवस हा सन २०११ पासून संपूर्ण देशभरात 'राष्ट्रीय मतदार दिन' म्हणून साजरा केला जातो. 'राष्ट्रीय मतदार दिन' साजरा करण्याचा मुख्य उद्देश हा मतदारांना, विशेषतः नवमतदारांना मतदार यादीत नाव नोंदणीसाठी प्रोस्ताहन देणे, सुलभरित्या त्यांची नोंदणी करून घेणे हा आहे.

या पार्श्वभूमीवर सुजाण व जबाबदार नागरिक घडविण्यासाठी **दि. २५ जानेवारी २०२२, रोजी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्य** महाविद्यालयांत / विभांगामध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत संदर्भिय शासन परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे. त्यासोबतच शासन परिपत्रकातील परिशिष्ठ १ व २ अन्वये (प्रत संलग्न) आपल्या महाविद्यालयांत / विभागांमध्ये कार्यक्रमाचे आयोजन कसे करण्यात यावे याबाबत निर्देश देण्यात आले आहे.

करिता सदर परिपत्रक निर्गमित करण्यात येत असून सर्व संबंधितांनी उपरोक्त संदर्भिय शासन परिपत्रकाचे अवलोकन करून **'राष्ट्रीय मतदार दिन'** साजरा करण्याची कार्यवाही करावी व त्याचा अहवाल विद्यापीठ प्रशासनास सादर करावा.

सलग्न – संदर्भिय शासन परिपत्रक

15/1/22

(डॉ. सुभाष वाघमारे)
कुलसचिव (अतिरिक्त भार)

**प्रति,**
**सर्व विभागप्रमुख,**
**विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य,**

प्रत माहिती करिता तथा आवश्यक कार्यवाही करिता :-

१. मा. कुलगुरू यांचे स्विय सहाय्यक
२. मा. प्र-कुलगुरू यांचे स्विय सहाय्यक
३. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे
४. शैक्षणिक विभागांचे सर्व विभागप्रमुख, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ यांना उचित कार्यावहीसाठी सादर
५. संलग्नित महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ यांनी उचित कार्यवाहीकरिता सादर
६. डॉ. संजय शितोळे, विद्यापीठ संकेत स्थळावर प्रकाशित करण्याबाबत सादर.

अकृषी विद्यापीठे व त्याच्याशी संलग्न महाविद्यालयामध्ये, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व तत्सम शैक्षणिक संस्थांमध्ये दि. २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिन राबविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र. १५३/विशि-३,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दि. २२ डिसेंबर, २०२१.

वाचा : १) उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१५३/विशि-३, दि.२३ जुलै, २०२१.

२) प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी यांचे अर्धशासकीय पत्र क्रमांक: संकीर्ण-२०२१/प्र.क्र.८००/२१/३३, दिनांक २० डिसेंबर, २०२१.

परिपत्रक

दि.२५ जानेवारी, १९५० रोजी भारत निवडणूक आयोगाची स्थापना झाली. भारत निवडणूक आयोगाचा हा स्थापना दिवस २०११ पासून संपूर्ण देशभरात -राष्ट्रीय मतदार दिन॰ म्हणून साजरा केला जातो. राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्याचा मुख्य उद्देश हा मतदारांना, विशेषतः नवमतदारांना मतदार यादीत नाव नोंदणीसाठी प्रोत्साहन देणे, सुलभरीत्या त्यांची नाव नोंदणी करून घेणे, हा आहे. देशातील मतदारांना समर्पित केलेल्या या दिवसाचा उपयोग मतदारांचा निवडणूक प्रक्रियेतील सहभाग वाढावा म्हणून त्यांना जागरूक करण्यासाठी केला जातो. राष्ट्रीय मतदार दिनाच्या कार्यक्रमात नवमतदारांचा सत्कार करून त्यांना मतदार ओळखपत्र दिले जाते.

२. या पार्श्वभूमीवर सुजाण आणि जबाबदार नागरिक घडविण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व अकृषी विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयांमध्ये दि. २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिन दरवर्षी अनिवार्यपणे साजरा करण्यात यावा. सदर दिवशी पुढीलप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे :

१. शासनाच्या समक्रमांकाच्या दि. २३/०७/२०२१ च्या परिपत्रकान्वये, सर्व अकृषि विद्यापीठे व त्याच्याशी संलग्न महाविद्यालयांमध्ये, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व तत्सम शैक्षणिक संस्थांमध्ये निवडणूक साक्षरता मंडळ स्थापन करण्याच्या सूचना यापूर्वी देण्यात आल्या आहेत. महाविद्यालयांमध्ये स्थापन केलेल्या निवडणूक साक्षरता मंडळ या व्यासपीठांतर्गत सदर दिवशी विद्यार्थ्यांसाठी मताधिकार, लोकशाही या विषयासंबंधी विविध स्पर्धा घेण्यात याव्यात : निबंध, वक्तृत्व, रांगोळी, चित्रकला, भित्तिपत्रक (पोस्टर), रील (एक मिनिटांचे व्हिडिओ), मीम, गाणे, विडंबन काव्य, घोषवाक्य इ. स्पर्धा. (मताधिकार, लोकशाही या संबंधीच्या सर्वसमावेशक स्पर्धांच्या विषयांची यादी सोबत जोडलेल्या परिशिष्ट १ मध्ये देण्यात आली आहे.)
२. मताधिकार, लोकशाही यासंबंधी परिसंवाद, व्याख्यान यांचे आयोजन करावे.
३. विद्यार्थ्यांसोबत लोकशाहीवर निष्ठा ठेवण्यासंबंधी शपथ घेण्याचा कार्यक्रम घेण्यात यावा (मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांतील शपथेचा नमुना सोबत जोडलेल्या परिशिष्ट २ मध्ये देण्यात आलेला आहे.)

३. उपरोल्लिखित उपक्रमांशिवाय महाविद्यालयांना इतरही पद्धतीने राष्ट्रीय मतदार दिन साजरा करता येईल. परिशिष्ट १ मध्ये नमूद केलेल्या स्पर्धाव्यतिरिक्त इतरही नाविन्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन करुन २५ जानेवारी हा दिवस "राष्ट्रीय मतदार दिन" म्हणून दरवर्षी साजरा करण्यात यावा. तसेच, सदर कार्यक्रम साजरा करताना कोविड-१९ संबंधी शासनाच्या नियमांचे पालन करण्यात यावे.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्यांचा संकेतांक क्रमांक २०२११२२२१६२९०३०१०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AJIT MADHUKARRAO
BAWISKAR

(अजित म. बाविस्कर)
उप सचिव
उच्च व तंत्र शिक्षण विभाग

प्रत -

१. मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव.
२. मा. प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी मंत्रालय, मुंबई.
३. कुलगुरू, सर्व अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे.
४. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.
५. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.
६. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे.
७. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
८. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
९. जिल्हा निवडणूक अधिकारी, सर्व जिल्हे.
१०. निवड नस्ती.

## परिशिष्ट १

विविध स्पर्धांसाठी विषयांची यादी पुढे देण्यात आली आहे. महाविद्यालयांना याव्यतिरिक्त इतरही स्पर्धा मताधिकार, लोकशाही यांसंबंधी विषय देऊन घेता येतील. यांतील काही स्पर्धा राष्ट्रीय मतदार दिनाच्या आधी घेऊन सदर दिवशी विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात यावीत. तसेच, रांगोळी, भित्तिपत्रक या स्पर्धांचे आयोजन सदर दिवशीही करता येईल, जेणेकरून वातावरणनिर्मिती होईल. या काळात महाविद्यालये ऑनलाइन सुरू असतील तर आभासी व्यासपीठावरून शक्य होतील, अशा स्पर्धा घेण्यात याव्यात.

अ. निबंध

१. मी मताधिकार बजावणार कारण...
२. मताधिकाराची सक्ती करावी का?
३. सोहळा लोकशाहीचा, जागर मताधिकाराचा
४. हक्क वंचितांचे, मार्ग मताधिकाराचा
५. मी नव्या युगाचा/युगाची मतदार
६. शहरी मतदारांची अनास्था - कारणे आणि उपाय
७. मी माझं मत विकणार नाही!
८. एका बोटावरच्या शाईची किंमत?

आ. मीम

१. निवडणुकीच्या दिवशी फिरायला जाणारे लोक
२. सगळी व्यवस्था भ्रष्ट आहे असे समजून मताधिकार न बजावणारे लोक
३. मतदार नोंदणी न करणारे लोक
४. अठराव्या वर्षाची जबाबदारी - मतदार नोंदणी
५. माझ्या महाविद्यालयातील १८ वर्षे पूर्ण केलेल्या युवांनी मतदार नोंदणी करावी म्हणून...

इ.लघुपट

१. गोष्ट लोकशाहीची
२. मताधिकार हा माझा कायदेशीर अधिकार
३. सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराचे महत्त्व
४. अपंगांच्या मताधिकाराचे महत्त्व आणि आवाहन
५. तृतीय पंथीयांच्या मताधिकाराचे महत्त्व आणि आवाहन

ई. वक्तृत्व

१. आपल्या देशात लोकशाही रुजली आहे का?
२. ...म्हणून मी मताधिकार बजावतो / बजावते!
३. लोकशाही आणि तरुण मतदार
४. व्यवस्था बदलाचा राजमार्ग : मताधिकार
५. मताधिकाराची सक्ती करावी का?
६. सक्षम लोकशाहीची पहिली पायरी - मतदार नोंदणी

उ. चित्रकला

१. १८ वर्षे पूर्ण झालेल्यांना मतदार नोंदणी करण्याचे आवाहन
२. स्त्रियांना मतदार नोंदणीचे आवाहन
३. अपंगांच्या मताधिकाराचे महत्त्व आणि आवाहन
४. तृतीय पंथीयांच्या मताधिकाराचे महत्त्व आणि आवाहन

ऊ. घोषवाक्य

१. सर्वोत्कृष्ट शासनपद्धती - लोकशाही
२. १८ वर्षे पूर्ण झालेल्यांना मतदार नोंदणीचे आवाहन
३. मताधिकाराचे महत्त्व

ए. गाणे

१. लोकशाही शासनपद्धतीचे फायदे
२. १८ वर्षे पूर्ण झालेल्यांना मतदार नोंदणीचे आवाहन
३. सक्षम लोकशाहीसाठी मताधिकाराचे महत्त्व

परिशिष्ट २

राष्ट्रीय मतदार दिवस

मतदारांसाठी प्रतिज्ञा

## मराठी

"आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून; याद्वारे, प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परपरांचे जतन करु आणि मुक्त नि:पक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणूकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणूकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करु."

*****************

## हिंदी

"हम, भारत के नागरिक, लोकतंत्र मे. अपनी पूर्ण आस्था रखते हुए यह शपथ लेते है की हम अपने देश की लोकतांत्रिक परम्पराओंकी मर्यादा को बनाए रखेंगे तथा स्वतंत्र, निष्पक्ष एवं शांतिपूर्ण निर्वाचन की गरिमा को अक्षुण्ण रखते हुए, निर्भीक होकर, धर्म, वर्ग, जाति, समुदाय, भाषा अथवा अन्य किसी भी प्रलोभन से प्रभावित हुए बिना सभी निर्वाचनों में अपने मताधिकार का प्रयोग करेंगे."

*******************

## English

"We, the citizens of India, having abiding faith in democracy, hereby pledge to uphold the democratic traditions of our country and the dignity of free, fair and peaceful elections, and to vote in every election fearlessly and without being influenced by considerations of religion, race, caste, language or any inducement."

**************